**(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)**

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायधिकारात.**

**नागपूर खंडपीठ, नागपूर.**

**दुसरे अपील क्र. २३६/२०१४**

१. चंद्रभागा कोल्हे (मृत)
कायदेशीर वारसां द्वारे
**१ ए.** रमेश वल्द काशीनाथ कोल्हे,
वय अंदाजे ५८ वर्ष, धंदा - मजूरी,
राहणार - वडाळी, अमरावती.

**१ बी.** दिलीप वल्द काशीनाथ कोल्हे
वय अंदाजे ४५ वर्ष, धंदा - मजूरी,
राहणार - आनंदवाडी, तहसील – आष्टी,
जिल्हा - वर्धा.

**१ सी.** सौ. राधा जौजे सुनीलराव झुनूरकर,
वय अंदाजे ३५ वर्ष, धंदा - घरकाम,
राहणार -गजानन नगर, वर्धा. -----------------------**अपिलार्थी**

**- विरुद्ध -**

**१.** सूर्यभान वल्द चंपतराव शेंडे
(मृत) कायदेशीर वारसां द्वारे,
**१ ए.** श्रीमती कमलाबाई जौजे सूर्यभान शेंडे,
वय अंदाजे ६५ वर्ष, धंदा - शेती,

**१ बी.**भय्या वल्द सूर्यभान शेंडे
वय ३८ वर्ष, धंदा - शेती,
दोन्ही उत्तरवादि राहणार - आनंदवाडी,
तहसील -आष्टी, जिल्हा -वर्धा.

**१ सी.** अर्चना जौजे राजेंद्र सूर्यवंशी,
वय ३८ वर्ष, धंदा - घरकाम,
राहणार वाडीभास्मे हाऊस,
चंद्रकांत ज्वेलर्स जवळ, हनुमान मंदिरच्या बाजूला,
राजेंद्र नगर, नंदनवन, झोपडपट्टी, नागपूर.

(न्यायालयीन आदेश दिनांक २१/०८/२०१८ नुसार करण्यात आलेली सुधारणा)

**१ डी.** जगदीश वल्द सूर्यभान शेंडे,
वय अंदाजे ३४ वर्ष, धंदा - शेती,
राहणार - आनंदवाडी, तहसील – आष्टी,
जिल्हा -वर्धा.

**१ ई.** श्रीमती अल्का जौजे दिगंबर कांबळे,
वय- ३२ वर्ष, धंदा- घरकाम
राहणार - भूखंड क्रमांक १७, पहिली गल्ली,
शेषनगर, खरबी रोड, हसनबाग,
बुद्ध विहार जवळ, नागपूर.
(न्यायालयीन आदेश दिनांक २१/०८/२०१८ नुसार करण्यात आलेली सुधारणा)

**१ एफ.** श्रीमती जयश्री जौजे अनिल सोनोने,
वय अंदाजे ३० वर्ष,धंदा - घरकाम,
राहणार - भट्टीपुरा, शिरसपेठ, नागपूर ...................... **उत्तरवादि**

---

**अपीलकर्त्यांसाठी वकील पी. डी. मेघे सह वकील कु. आरती सिंग.**

---

**न्यायपीठ : श्रीमती एम. एस. जवळकर, न्यायमूर्ति**

**न्यायनिर्णय राखून ठेवण्याचा दिनांक - ०१/०३/२०२३**

**न्यायनिर्णय जाहीर करण्याचा दिनांक - ०६/०३/२०२३**

**न्यायनिर्णय -**

अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले.

२. समन्स तामिल होऊन हि उत्तरवादि प्रस्तुत दुसऱ्या अपील मध्ये हजर झाले नाही.

३. विद्यमान दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ विभाग, आष्टी यांनी नियमित दिवाणी दावा क्र. २४२/१९९२ (जुना क्र. ३७/१९९१) दिनांक ०७/१०/१९९७ मध्ये पारित केलेले न्यायनिर्णय आणि हुकूमनामा विद्यमान तदर्थ जिल्हा न्यायधीश, वर्धा यांनी नियमीत दिवाणी अपील क्रमांक. २/१९९८ मध्ये दिनांक ३०/०१/२०१४ रोजी कायम केलेल्या न्यायनिर्णयाने व्यथित

झाल्यामुळे अपीलकर्त्याने सदर अपील दाखल केली आहे.

४. ०५/१०/२०१५ च्या आदेशानुसार कायद्याचे खालील महत्त्वपूर्ण प्रश्न तयार करून सदर अपील स्वीकारण्यात आली आहे :

(i) जेव्हा अपीलकर्त्याने आपल्या वादपत्रात परित्यक्त खबरदारीचा निष्कर्ष म्हणून सांगितले होते की, १९९० मध्ये तिच्या भावाने लबाडीने वाटणी पत्र तयार करण्याच्या बहाण्याने तिच्या काही स्वाक्षऱ्या घेतल्या होत्या, तेव्हा विद्यमान कनिष्ठ न्यायालयांनी अभिलेखावर असे नोंदवणे योग्य आहे की वर्तमान अपीलककर्ता हे सिद्ध करण्यात अयशस्वी ठरला का की प्रतिवादीने हक्क सोडण्याचा लेख फसव्या पद्धतीने हस्तगत केला होता, विशेषतः जेव्हा प्रतिवादी स्वतः अभिलेखावर हक्क सोडण्याचा लेख अभिलेखावर सादर करण्यास अयशस्वी ठरला ?

(ii) केवळ अपीलकर्त्याच्या वडिलांच्या मृत्यूनंतर तिच्या बाजूने एक विक्रीपत्राचा - लेख अंमलात आल्यामुळे, त्या परिस्थितीमुळे असा निष्कर्ष निघू शकेल का की अपीलकर्त्याच्या भावाने म्हणजेच प्रतिवादीने मालमत्ता खरेदी करण्यासाठी तिला मदत केली आणि असे म्हणता येईल का की सदर परिस्थिती अपीलकर्त्याला वाटणी - पत्राचा हुकूमनामा देण्यास वंचित करते ?

(iii) अपीलकर्ता दाव्याच्या मालमत्तेत हक्कदार नाही किंवा दाव्याच्या मालमत्तेत तिचा हिस्सा नसल्याचा निष्कर्ष नोंदवल्याशिवाय तीच्या बाजूने विभाजन आणि स्वतंत्र ताबा घेण्याचा हुकूम नाकारण्यात विद्यमान न्यायलयास अधिकार आहे का ?"

५. वादी यांचे प्रकरण खालीलप्रमाणे आहे :

अपीलकर्ता आणि उत्तरवादी हे भाऊ-बहीण आहेत . अपीलकर्ता आणि उत्तरवादीचे वडील मौजा सैयदपूर आणि अबदलपूर, तहसील आष्टी, जिल्हा वर्धा येथे असलेल्या शेती चे मालक आणि कब्जेदार होते. मालमत्ता क्षेत्राचे वर्णन (अ) मौजा सैयदपूर,

मौजा क्र. ४४६, तहसील -आष्टी, जिल्हा -वर्धा, भूमापन क्र. ४१, क्षेत्र- १.०८, भूमुल्यमापन - ४:३५, वर्ग- १, (ब) मौजा - अब्दालपूर, मौजा क्र. - १९, तहसील - आष्टी, जिल्हा - वर्धा, भूमापन क्र. - ७, क्षेत्र - २. १२ हे. आर., जमा - १०.५०, वर्ग - २ आणि (क) मौजा - अजितपूर, मौजा क्र. - १९, तहसील - आष्टी, जिल्हा - वर्धा, भूमापन क्र. - २७/१, क्षेत्र - १. १५, जमा - ५.२५, वर्ग – १. अपीलकर्ता आणि उत्तरवादी यांचेयांच्य वडिलांचे दिनाकं ०३/०३/१९७७ रोजी निधन झाले त्यांच्या पश्चात अपीलकर्ता आणि उत्तरवादि हे त्याचे कायदेशीर वारसदार आहेत. वडिलांच्या मृत्यूनंतर मालमत्ता अ ते क मध्ये अपीलकर्ता आणि उत्तरवादी यांचा बरोबरीचा म्हणजेच १/२ हिस्सा आहे. तरीही मालमत्ता ही अपीलकर्ता आणि उत्तरवादी यांची संयुक्त मालमत्ता आहे. अपीलकर्त्याने उत्तरवादीला या मालमत्तेची वाटणी करण्याची अनेकदा मागणी केली परंतु ती निष्फळ ठरली. अपीलकर्त्याने, वाटणीसाठी दिनाकं ३/०६/१९८६ रोजी वकिलामार्फत नोंदणीकृत नोटीस जारी केली. उत्तरवादीला सदर नोटीस मिळाली पण त्याने त्याची दखलही घेतली नाही आणि त्याला उत्तरही दिले नाही. या उलट उत्तरवादिने अपीलकर्त्यासोबत खोटा खेळ खेळला आणि त्याने अपीलकर्त्याच्या एका मुद्रांक पेपर वर वाटणी-पत्राच्या संदर्भाने स्वाक्षऱ्या घेतल्या. अपीलकर्त्याला उत्तरवादिने तीच्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन हक्क सोडण्याबाबतचे एक दस्ताऐवज केल्याबाबतचे कळले. जेव्हा उत्तरवादिने सदर हक्क सोडण्याच्या लेखाच्या आधारे फेरफार नोंदी साठी अर्ज दाखल केला आणि दिनांक २३/०७/१९९० रोजी जेव्हा तीला तलाठी कडून नोटीस प्राप्त झाली तेव्हा तिला सदर दस्ताऐवजाबद्दल माहिती मिळाली आणि त्याआधारे तिने वाटणी आणि स्वतंत्र मालकीसाठी दावा दाखल केला. खरं तर, अपीलकर्त्याने उत्तरवादीच्या बाजूने कधीही कोणतेही हक्क सोडण्याबाबतचे दस्ताऐवज केले नाही.

६. उत्तरवादिने लेखी निवेदन दाखल केले आणि सांगितले की, दाव्याची मालमत्ता ही चंपतरावांची स्वसंपादित मिळकत होती आणि म्हणूनच, दाव्यातील जमिनीचे ते स्वतः एकमेव मालक आणि ताबेदार होते. विद्यमान कनिष्ठ न्यायालयाने अभिलेखावर असलेले पुरावे ग्राह्य धरून अपीलकर्ता/ वादी यांचा दावा फेटाळला. यामुळे व्यथित झाल्यावरून अपीलकर्त्याने जिल्हा न्यायालय, वर्धा यांच्या समक्ष नियमीत दिवाणी अपील क्र. ०२/१९९८ दाखल केली. विद्यमान अपिलीय न्यायालयाने ती अपील खर्चासह फेटाळून

लावली. उपरोक्त न्यायनिर्णय आणि आणि हुकूमनामा हा प्रस्तुत अपीलचा विषय आहे.

७. अपीलकर्त्याचा युक्तिवाद असा आहे की, विद्यमान कनिष्ठ न्यायालय वाटणीच्या समस्येवर तोडगा काढण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आणि विपर्यस्त निष्कर्षाची नोंद केली की, वडिलांच्या मृत्यूनंतर १४ वर्षांपेक्षा जास्त काळ तिने वाटणीसाठी खटला दाखल केला नाही, कारण तिच्या भावासह तिचे नाव अधिकार अभिलेखच्या नोंदी तसेच ७/१२ च्या उताऱ्यावर नोंदवलेले होते आणि अशा प्रकारे तिचे मौन म्हणजे तिने वाटणीचा अधिकार सोडण्यासारखा आहे.

८. विद्यमान कनिष्ठ न्यायालयाने हे निष्कर्ष चुकीचे नोंदविलेले आहे कि तिने (वादीने) आपल्या दाव्यात अशी विनवणी केली होती कि तिच्या भावाने तिच्या काही स्वाक्षऱ्या हक्क- सोडण्याच्या लेखावर घेतल्या होत्या आणि जसे कि हक्क-सोडण्याचा लेख सादर केला गेला नसल्यामूळे ती फसवणूक तिच्या भावाकडून करण्यात आली होती हे सिद्ध करण्यात ती अपयशी ठरली आणि पुढे असा निष्कर्ष नोंदविण्यात आला कि ती वाटणीच्या हुकूमनाम्यासाठी पात्र नाही. हे स्पष्ट आहे की जेव्हा प्रतिवादी द्वारे हक्कसोडण्याचा लेख सादरच केला गेला नाही अश्या परिस्थितीत हक्क सोडण्याच्या लेखाच्या संदर्भात विद्यमान कनिष्ठ न्यायालयाने नोंदविलेले निष्कर्ष रद्द ठरविणे आवश्यक आहे.

९. विद्यमान कनिष्ठ न्यायालयाने हा निष्कर्ष काढण्यात पूर्णपणे चूक केली आहे कि वडिलांच्या मृत्यूनंतर वादीच्या पतीच्या बाजूने खरेदीखत नोंदणीकृत झाले आणि त्या शेताची खरेदी करण्यात अपीलकर्त्याच्या भावाची मदत झाली असावी आणि त्यामुळेच अपीलकर्त्याने फाळणीसाठी दावा दाखल केला नाही असा चुकीचा निष्कर्ष काढून पुढे असेही नोंदवले आहे की वाटणीचा हुकूमनामा नाकारण्यासाठी हि परिस्थिती पुरेशी आहे. अशा प्रकारे हा विपर्यस्त निष्कर्ष कायद्याच्या नजरेसमोर टिकू शकत नाही आणि तो रद्द ठरवला जाऊ शकतो. अभिलेखावर कोणतेही पुरावे नसतानांही केवळ अनुमान आणि अंदाजाच्या आधारावर, विद्यमान कनिष्ठ न्यायालयाद्वारे निष्कर्ष काढले गेले आहेत.

१०.		दाव्यातील उत्तरवादीचा युक्तिवाद असा आहे की त्यांच्या वडिलांच्या हयातीत, त्यांच्या वडिलांनी टेंभा गावातील भूमापन क्रमांक ३ मधील १ . ०६ एच. आर. इतकी जमीन वादीला दिली होती, परंतु वडिलांच्या हयातीत खरेदी-खताची अंमलबजावणी पूर्ण होऊ शकली नाही. उत्तरवादीने स्वतः दिनांक ३१/०३/१९७७ रोजी अपीलकर्त्याच्या बाजूने कथित खरेदी-खत अंमलात आणले. मृत चंपतराव यांनी वादीच्या उपस्थितीत मृत्यू-पत्र केले होते. सदर मृत्यू-पत्रानुसार या जमिनीचा उत्तरवादी हा एकमेव मालक आहे.

११.		वादीचा दावा असा आहे कि, सन १९९० मधे वाटणी-पत्र करण्याच्या बहाण्याने, तिच्या भावाने तिची स्वाक्षरी घेतली होती परंतु (मालमत्तेची) वाटणी झालीच नाही. दिनांक ०३/०३/१९७७ रोजी तिच्या वडिलांचा मृत्यू झाला. तिला तिच्या भावांसह कायदेशीर वारस म्हणून दाव्यातील मालमत्तेची वाटणी करून मिळण्याचा अधिकार आहे. दिनांक ०३/०६/१९८६ रोजी तिने प्रदर्श क्रमांक ३६ वर असेलेली कायदेशीर नोटीस प्रतिवादींना पाठवली होती, जी त्यांना विधीवत प्राप्त झाली. प्रतिवादींनी सदर नोटीसला उत्तर दिले होते. नोटीस प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादींनी वादीला कळवले होते कि मालमत्तेची वाटणी करून तिला मालमत्ता देण्यात येईल. प्रतिवादीने वादीची स्वाक्षरी घेतली आणि त्याने अचलपूर येथील हिस्सा दिला असे सांगितले होते. परंतु वादीला ताबा देण्यात आला नव्हता. ज्या दस्ताऐवजावर वादीची स्वाक्षरी करून घेण्यात आली होती ते दस्ताऐवज प्रतिवादीने तहसीलदारासमक्ष त्याच्या नावे फेरफार नोंदी करण्यासाठी सादर केले तेव्हा तीला तहसीलदाराने नोटीस पाठवली. जेव्हा वादीने तहसीलदार कार्यालयात सदर मामल्याबाबत चौकशी केली. तेव्हा वादीला प्रतिवादींच्या वाईट हेतू बद्दल कळले आणि तेव्हा तिने प्रतिवादींच्या फेरफार अर्जावर लेखी आक्षेप सादर केला. तहसीलदारसमक्ष आक्षेप उपस्थित केल्यानंतर, दिनांक २३/०७/१९९० रोजी तिने कायदेशीर नोटीस जारी करून त्यात हक्क सोडण्याचा-लेख नोंदणीच्या अभावी आणि बेकायदेशीर असल्याकारणाने निष्क्रिय असल्यामुळे स्वीकार्य नाही असा दावा केला. प्रतिवादी यांनी लेखी निवेदनाद्वारे सदर मालमत्ता हि त्यांच्या वडिलांची स्वअर्जित मालमत्ता आहे असे सादर केले. त्याने वादीचा हिस्सा नाकारला. त्यांनी असा युक्तिवाद केला कि टेंभा गावातील भूमापन क्रमांक ३ स्थित १.०६ हे. आर. जमीन त्यांच्या वडिलांनी स्वतःच्या हयातीत वादीला दिली होती. परंतु त्याचे

विक्री-पत्र अंमलात आणले गेले नव्हते, जे दिनांक ३१/०३/१९७७ रोजी वादीच्या बाजूने नोंदणीकृत झाले. प्रतिवादी यांचा पुढे असा दावा आहे कि मृत चंपतराव (वादी आणि प्रतिवादी यांचे वडील) यांनी वादीच्या उपस्थितीत मृत्यू-पत्र तयार केले होते आणि सदर मृत्यू-पत्राद्वारे प्रतिवादी हा त्या जमिनीचा एकमेव मालक आहे. विद्यमान न्यायचौकशी न्यायालयाने सदर दावा खारीज केला.

१२. विद्यमान कनिष्ठ न्यायालयाने प्रार्थमिकपणे या वस्तुस्थितीची दखल घेतली नाही की प्रतिवादी ज्या हक्क-सोडण्याच्या लेखावर अवलंबून आहे तो लेख अभिलेखावर दाखल केलेला नाही आणि तो वादीद्वारे विवादित केलेला आहे. प्रतिवादीचा युक्तिवाद असा आहे की त्यांच्या वडिलांनी मृत्यू-पत्र तयार केले होते आणि ते सन १९७७ च्या पूर्वीचेच असावे. जर असे कोणत्याप्रकारचे मृत्यू-पत्र अस्तित्वात असते तर वादी कडून १९९० साली अश्याप्रकाराचा हक्क सोडण्याच्या लेख तयार करण्याचा कोणतेही कारण नव्हते. प्रतिवादीचे वर्तन स्पष्टपणे असे दर्शविते की त्याला वादीची फसवणूक करायची होती. विद्यमान न्यायचौकशी न्यायालय तसेच अपिलीय न्यायालयाने या तथ्याचे योग्य दृष्टिकोनातून मूल्यांकन केले नाही आणि विपर्यस्त निष्कर्षांची नोंद केली. नोंदणी कायद्याच्या कलम १७ (१) (बी) नुसार हक्क-सोडण्याच्या लेखाची विहित नोंदणी करणे आवश्यक होते. प्रतिवादीचा दावा "मृत्यू-पत्र" या वर आधारित आहे. प्रतिवादीचा असा युक्तिवाद आहे की, वादीच्या वडिलांनी लिहिलेल्या मृत्युपत्रात त्याने वादीच्या नावे शेत खरेदीसाठी रक्कम भरल्याचे नमूद आहे. तथापि, मृत्यू-पत्र अभिलेखावर सादर केलेले नाही किंवा ते सिद्धही झालेले नाही. केवळ काही कबुलींच्या जसे की वादीच्या पतीची आर्थिक स्थिती चांगली नव्हती ज्यामुळे तिला नवीन जमीन खरेदी करणे शक्य नव्हते हा आधार अश्या प्रकारचा कोणताही निष्कर्ष काढण्यासाठी पुरेसा नाही. प्रत्यक्षात, अभिलेखावर असे आले आहे कि वादीच्या पतीने सन १९७२ मध्ये त्याची जमीन विकली आणि १९७७ मधे रुपये २,०००/- मध्ये टेंभा गावात जमीन विकत घेतली. यातून, विद्यमान न्यायचौकशी न्यायालयाने निष्कर्ष काढला की, "याचा अर्थ नक्कीच असा आहे की, टेंभा गावात वादीच्या नावावर जमिनीच्या खरेदीसाठी प्रतिवादीने निश्चितपणे रक्कम भरली असली पाहिजे. हा निष्कर्ष विपर्यस्त आहे आणि अंदाज आणि अनुमानावर आधारित आहे. जोपर्यंत मृत्यू-पत्र किंवा हक्क-सोडण्याचा लेख अभिलेखावर

दाखल केली जात नाही आणि ते योग्यरित्या सिद्ध केल्या जात नाही तो पर्यंत खालील न्यायालयाने वादी आणि प्रतिवादी या दोघांची नावे ज्या जमिनीसंदर्भात अभिलेखावर दिसत आहेत त्या जमीनिच्या वाटणीचा दिलासा नाकारता कामा नये. विद्यमान अपिलीय न्यायालयाने आपल्या बुद्धीचा वापर न करता सदर अपील खारीज केली .

१३. अपीलकर्त्यांचे विद्वान वकील येल्लापू उमा महेश्वरी आणि इतर-विरुद्ध- बुद्ध जगदीश्वरराव आणि इतर (२०१५) १६ एस.सी.सी ७८७ मध्ये नोंदवलेल्या न्यायनिर्णयावर अवलंबून आहेत.

> १५. दस्तऐवजासाठी दिलेले नामांकन निर्णायक घटक नसून व्यवहाराचे स्वरूप आणि वस्तुस्थिती दस्तऐवजांच्या अटींच्या संदर्भात निश्चित करणे आवश्यक आहे आणि एखाद्या दस्ताऐवजाची स्वीकार्यता पूर्णपणे समाविष्ट असलेल्या त्या दस्ताऐवजातील वाक्प्रचारावर अवलंबून असून ज्या पक्षाने प्रश्नामध्ये दस्ताऐवज सादर करण्याचा प्रयत्न केला आहे त्याने केलेल्या युक्तिवादांच्या आधारावर नाही. प्रदर्श बी-२१ आणि बी-२२ या दोन्ही कागदपत्रांचे सखोल वाचन केल्यास हे स्पष्ट होते की, ज्या दस्ताऐवजाद्वारे स्थावर मालमत्तेच्या संदर्भात हक्काचा अधिकार सोडला जातो तो दस्ताऐवज अपरिहार्यपणे नोंदणीकृत असायलाच पाहिजे आणि जर तो नोंदणीकृत नसेल तर, नोंदणी कायद्याच्या कलम ४९ नुसार सदर दस्ताऐवज अस्वीकार्य पुरावा ठरतो. त्यामुळे प्रदर्श बी-२१ आणि बी-२२ हे जे दस्ताऐवज आहेत ते नोंदणी कायद्याच्या कलम १७ (1) (बी) च्या चौकोनी कक्षेत येतात आणि म्हणून ते दस्ताऐवज नोंदणी करणे अनिवार्य आहेत आणि तेदस्ताऐवज पक्षांमधील विभाजनाची वस्तुस्थिती सिद्ध करण्याच्या उद्देशाने पुराव्यामध्ये ग्राह्य आहेत. वाटणीचा प्राथमिक हेतू सिद्ध करण्याच्या उद्देशाने प्रदर्श बी-२१ आणि बी-२२ हे पुरावा स्वीकार्य नाहीत असे आमचे मत आहे.
>
> १६. मग पुढील प्रश्न विचारात घ्यायचा आहे की ते कोणत्याही सांपार्श्विक प्रयोजनासाठी वापरले जाऊ शकतात का ? चिन्नाप्पा रेड्डी गारी मुथ्याला रेड्डी - विरुद्ध - चिन्नाप्पा रेड्डी गारी वंकट रेड्डी ए आय आर १९६९ ए. पी. (२४२) मध्ये आंध्र प्रदेश

उच्च न्यायालयाच्या पूर्ण न्यायधीश मंडळाच्या खंडपीठाने असे मत मांडले आहे की विभाजनाची संपूर्ण प्रक्रिया तीन टप्प्यांत योजील्या जाते, म्हणजे स्थितीचे विभाजन, संयुक्त मालमत्तेचे अंतर आणि सीमा द्वारे विभाजन आणि विविध समभागांच्या ताब्याचे स्वरूप. वाटणीच्या खटल्यामध्ये, नोंदणी न केलेल्या दस्तऐवजावर सांपार्श्विक हेतूसाठी अवलंबून राहता येऊ शकते म्हणजे शीर्षकाची विभक्तता, विविध समभागांच्या ताब्याचे स्वरूप परंतु प्राथमिक हेतूसाठी नाही म्हणजे संयुक्त मालमत्तांचे अंतर आणि सीमा द्वारे विभाजन. अमुद्रांकित असलेले दस्ताऐवज जप्त होईपर्यंत सांपार्श्विक प्रयोजनासाठी देखील पुराव्यामध्ये स्वीकार्य नाही. त्यामुळे जर अपीलकर्त्यांना/प्रतिवादींना सदर दस्ताऐवज सांपार्श्विक प्रयोजनाच्या हेतूने चिन्हांकित करायचे असेल तर त्यांच्यासाठी दंडासह मुद्रांक शुल्क भरणे आणि कागदपत्रे जप्त करणे खुले आहे आणि पुरावा आणि प्रासंगिकतेच्या अधीन राहून सांपार्श्विक प्रयोजन उद्देशासत्व न्यायचौकशी न्यायालयास प्रदर्श बी-२१ आणि बी-२२ चिन्हांकित करण्याचे स्वातंत्र्य आहे.

१४. त्याप्रमाणे, हक्क सोडण्याचा लेख नोंदणीकृत असणे आवश्यक आहे अन्यथा तो पुरावा म्हणून स्वीकार्य नाही. प्रस्तुत दाव्यात, हक्क-सोडण्याचा लेखच सादर केला गेला नाही आणि प्रतिवादीचा दावा असाही नाही की ते नोंदणीकृत होते. त्यामुळे, अपील मंजूर केली जाऊ शकते आणि त्यानुसार, कायदाच्या महत्त्वपूर्ण प्रश्न क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी आहे. त्याचप्रमाणे, कायदाच्या महत्त्वपूर्ण प्रश्न क्रमांक २ आणि ३ चे उत्तर देखील नकारात्मक आहे. त्यानुसार, मी पुढील आदेश जारी करते :

**आदेश**

i) दुसरे अपील मंजूर करण्यात आले आहे.

ii) विद्यमान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, आष्टी यांनी नियमित दिवाणी दावा क्रमांक २४२/१९९२ (जुना क्रमांक ३७/१९९१) मधे दिनांक ०७/१०/१९९७ रोजी पारित केलेला न्यायनिर्णय व हुकूमनामा जे विद्यमान तदर्थ जिल्हा न्यायाधीश, वर्धा यांनी नियमित दिवाणी अपील क्रमांक. २/१९९८ मधे दिनांक ३०/०१/२०१४ रोजी न्यायनिर्णयाद्वारे व हुकूमनाम्याद्वारे कायम केले होते ते दोन्ही या न्यायनिर्णयान्वये रद्द बातल करण्यात येतात.

iii) दावा निकाली काढण्यात आला आहे. या द्वारे असे जाहीर करण्यात येते कि वादीचा मालमत्तेत विशेषतः परिच्छेद क्रमांक १ मध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेत अर्धा हिस्सा आहे आणि तिला त्याचा वेगळा ताबा देण्यात यावा .

iv) या आदेशांतर्गत दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ऑर्डर २० रुल १२ अंतर्गत दावा दाखल करण्यापासून ते ताबा देण्यापर्यंतचा दरम्यानच्या नफ्याबाबत चौकशी करण्याचे आदेश देण्यात येत आहे.

v) दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ५४ च्या तरतुदीनुसार परिच्छेद क्रमांक १ मध्ये वर्णन केलेल्या शेतजमिनीच्या वाटणीचा हुकूमनामा जिल्हाधिकारी, वर्धा यांना पाठवण्यात यावा.

vi) त्यानुसार प्रारंभिक हुकूमनामा काढण्यात यावा .

vii) पक्षकारांनी स्वतःचा खर्च स्वतः उचलावा.

**(श्रीमती. एम.एस. जवळकर, न्यायमूर्ति)**

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."